राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी तसेच कालबध्द पदोन्नती योजनेसाठी ग्राहय धरणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

### शासन निर्णय क्रमांकः एसएसएन-१००७/(१५४/०७)/टिएनटि-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: ६ मे, २०१४

वाचा :

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्र.-एसएसएन-१०९९/ (३०८/९९)/माशि-२, दिनांक २८ नोव्हेंबर, २००६.

२) शालेय शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय, क्र.चवेआ-१०८९/१११/माशि-२, दिनांक २ सप्टेंबर, १९८९.

३) शालेय शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय, क्र.चवेआ-१०८९/१४७/माशि-२, दिनांक १३ सप्टेंबर, १९९०.

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/ ९५/बारा, दि.८ जून, १९९५.

५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.३३/ ९५/बारा, दि.१ नोव्हेंबर, १९९५.

६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३३/ ९५/बारा, दि.२० मार्च, १९९७.

प्रस्तावना :

या विभागाच्या दिनांक २ सप्टेंबर, १९८९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील कर्मचा-यांना चतुर्थ वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतननिश्चिती करतांना शाळांना आलेल्या शंका व अडचणी विचारात घेऊन दिनांक १३ सप्टेंबर, १९९० च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामध्ये स्पष्टीकरण करण्यात आले आहे. मात्र या स्पष्टीकरणानुसार फक्त अनुदानित शाळांतील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात घेण्यात याव्यात असे नमूद करण्यात आले होते.

सिडको माध्यमिक विद्यालय, सिडको, नाशिक या माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी विनाअनुदान तत्त्वावरील माध्यमिक शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्यात यावी याकरिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली होती. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये खाजगी विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबत आदेश निर्गमित केलेला होता.

विधिमंडळात अनेकवेळा लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी व मा.उच्च न्यायालयाने अनेक न्यायालयीन प्रकरणांत दिलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने माध्यमिक शाळांतील शिक्षकांप्रमाणेच प्राथमिक शाळांतील शिक्षक व उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची विनाअनुदानित तत्त्वावरील सेवा वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी तसेच प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांची विनाअनुदान तत्त्वावरील सेवा कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राहय धरण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

राज्यातील सर्व मान्यताप्राप्त विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील / कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये केलेली सेवा खालील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी तसेच कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राहय धरण्यात यावी.

१) संबंधित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयास शासनाकडून वा सक्षम प्राधिका-याकडून विनाअनुदान तत्त्वावर परवानगी व मान्यता मिळालेली असली पाहिजे.

२) संबंधित शिक्षक / शिक्षकेतर पदास सक्षम प्राधिका-याने मान्यता दिलेली असणे आवश्यक आहे. तसेच या पदावर काम केलेल्या संबंधित उमेदवारास सक्षम प्राधिका-याने वैयक्तिक मान्यता दिलेली असणे आवश्यक आहे.

३) सक्षम प्राधिका-याने संबंधित पदास व नियुक्तीस मान्यता दिलेल्या दिनांकापासूनची विनाअनुदान तत्त्वावरील सेवा वरिष्ठ / निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्यात येईल. मात्र मान्यताप्राप्त अपूर्ण अर्हताधारक / अप्रशिक्षित उमेदवारांनी त्या पदासाठी विहित केलेली अर्हता ज्या दिनांकास प्राप्त केली असेल त्या दिनांकापासून त्यांची सेवा ग्राहय धरण्यात येईल.

४) संबंधित शिक्षकाची / शिक्षकेतर कर्मचा-याची नियुक्ती आरक्षणाच्या धोरणास अनुसरुन त्या त्या संवर्गात केलेली असणे आवश्यक आहे.

५) एखाद्या मागासवर्गीय उमेदवाराच्या नियुक्तीस एखाद्या विशिष्ट संवर्गाचा उमेदवार प्रयत्न

करुनही मिळाला नाही अशी सक्षम प्राधिका-याची खात्री झाली आहे म्हणून तो विशिष्ट संवर्गाचा बिंदू पुढे घेउन, अशा अन्य मागासवर्गीय उमेदवाराच्या नियुक्तीस सक्षम प्राधिका-याने सलग ५ वर्षे मान्यता दिलेली असेल, अशा शिक्षकाच्या/शिक्षकेतर कर्मचा-याच्या बाबतीत त्यांच्या प्रथम मान्यतेपासून म्हणजे मागील ५ वर्षाची सलग सेवा वरिष्ठ वा निवडश्रेणीसाठी तसेच शिक्षकेतर कर्मचा-यांच्या १२ वर्षांची सलग नियमित सेवा कालबध्द पदोन्नतीसाठी विचारात घेण्यात यावी. मात्र ही सर्व सेवा सलग पाच वर्ष नियमित आणि एकाच शाळेतील असणे आवश्यक आहे.

६) एखाद्या विशिष्ट संवर्गाचा विहित शैक्षणिक व प्रशिक्षित मागासवर्गीय उमेदवार प्रयत्न करुनही उपलब्ध होत नसेल, तर त्याच संवर्गाच्या अप्रशिक्षित उमेदवाराची शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी म्हणून नियुक्ती करण्याची सवलत काही अटींवर देण्यात आलेली आहे. अशा शिक्षकांनी /शिक्षकेतर कर्मचा-यांनी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या दिनांकापासूनची सलग सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी तसेच कालबध्द पदोन्नतीसाठी विचारात घेण्यात यावी.

७) कोणत्याही कारणास्तव शिक्षकाच्या / शिक्षकेतर कर्मचा-याच्या सेवेत खंड पडल्यास वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी तसेच कालबध्द पदोन्नतीसाठी धरावयाच्या अर्हताकारी सेवा कालावधीत, हा सेवाखंड विचारात घेण्यात येऊ नये. म्हणजेच, प्रत्यक्ष काम केलेलाच कालावधी विचारात घेण्यात यावा.

८) सेवेत खंड न पडता एकापेक्षा जास्त विनाअनुदान शाळेतील सेवाकाळ वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरावा.

९) उपरोक्त अटींव्यतिरिक्त शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक : चवेआ १०८९/१११/माशि-२, दिनांक २ सप्टेंबर, १९८९ मधील अटी व शर्तीही जशाच्या तशा लागू राहतील.

१०) कायम विनाअनुदान तत्त्वावरील शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयात केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

११) कायम विनाअनुदान तत्त्वावरील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयांमधील विहित शैक्षणिक अर्हताप्राप्त शिक्षकाने / शिक्षकेतर कर्मचा-याने त्याच संस्थेच्या अन्य विनाअनुदान तत्त्वावरील शाळेत वा अन्य विनाअनुदान तत्त्वावरील शाळेत नियुक्ती स्वीकारली, तर ती नवीन नियुक्ती ठरेल. या नियुक्तीस सक्षम प्राधिका-याने दिलेल्या मान्यतेच्या दिनांकापासूनची सेवा यासाठी विचारात घेण्यात यावी.

१२) वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी / कालबध्द पदोन्नतीसाठी १२ वर्षांची अर्हताकारी सेवा विचारात घेताना अन्य अटींची पूर्तता करीत असल्यास शिक्षणसेवक म्हणून व्यतीत केलेला कालावधी

विचारात घ्यावा.

१३) शिक्षकेतर कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीसाठी विनाअनुदानित काळातील सेवा विचारात घेताना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.४, ५ व ६ येथील शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

१४) या प्रीत्यर्थ येणारा खर्च टप्प्याटप्प्याने भागवावयाचा असून हा खर्च सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात भागविण्यात यावा तसेच आवश्यकता भासल्यास सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या आठमाही सुधारित अंदाजपत्रकामध्ये करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०५०६१६४५१६४८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Phadke Milind K

Digitally signed by Phadke Milind K
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Phadke Milind K
Date: 2014.05.06 18:02:31 +05'30'

( मि.का.फडके )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

४. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

५. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक

७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

८. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद

९. शिक्षण निरिक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), मुंबई.

१०.सर्व वरिष्ठ लेखा परिक्षक (शिक्षण विभाग)

११.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई.

१२.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - २, नागपूर.

१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १, मुंबई.

१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - २, नागपूर.

१५.महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.

१६.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

१७.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

१८. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई.

१९.उपसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई.

२०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२१. लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद

२२. वित्त विभाग, नगर विकास विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

२३.सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

२४.निवड नस्ती, टिएनटि-२